

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




# ई मासिक विद्यासंवाद

जून २०२४ | आवृत्ती-१२




## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून नव्या वाटा




विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

जून २०२४ | आवृत्ती–१२

मार्गदर्शक
**डॉ. सुभाष चौधरी**
कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र–कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु
**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र–कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**

# वैचारिक विश्व निर्माण करणाचे शिक्षण देणारी प्रणाली

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सल्लागार समितीच्या सदस्य डॉ. अमी उपाध्याय यांचे प्रतिपादन

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-शंका, समाधान आणि नव्या वाटा' या विषयावर चर्चासत्र







दासत्वातून मुक्त करीत वैचारिक विश्व निर्माण करण्याचे शिक्षण देणारे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) असल्याचे प्रतिपादन अहमदाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरू आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सल्लागार समितीच्या सदस्य डॉ. अमी उपाध्याय यांनी केले. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-शंका, समाधान आणि नव्या वाटा' या विषयावर सखे सोबती फाऊंडेशन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, भारतीय शिक्षण मंडळ आणि आडोलसंट हेल्थ अकॅडमी नागपूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य सुरेश भट सभागृहात मंगळवारी (११ जून २०२४) चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कविश्वर, मानव विज्ञान अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्याम कोरेटी, भारतीय शिक्षण मंडळाचे प्राचार्य डॉ. अखिलेश पेशवे उपस्थित होते. सखे सोबती फाउंडेशनचे डॉ. महेंद्र मुलकलवार, श्री शशिकांत मानापुरे, अडोलसंट हेल्थ अकॅडमीचे डॉ. लिनेश यावलकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. आपल्या समोरील असलेल्या समस्यांचे समाधान शोधण्यास मदत करणारी अशी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक प्रणाली असल्याचे सांगत डॉ. अमी उपाध्याय यांनी पुस्तकासाठी आपला आवडता छंद, कौशल्य सोडण्याची वेळ येणार नसल्याचे सांगितले. आपणास अंगीभूत असलेल्या कौशल्याला विकसित करीत पुढे नेण्याचा मार्ग एनईपीने प्रशस्त केला आहे. शिक्षण चार भिंतीतून मिळत नाही. त्यामुळे वर्गातील शिक्षण कमी करीत प्रात्यक्षिक तसेच वैयक्तिक क्षमता सुधारणा योजना, कौशल्य विकास, मूल्यशिक्षण यावर भर देण्यात आला आहे. सोबतच विद्यार्थी केंद्रित असलेल्या एनईपीने विद्यार्थ्यांना विषय निवडीचे तसेच एकाधिक प्रवेश एकाधिक निर्गमन (मल्टिपल एन्ट्री, मल्टिपल एक्झिट)चे स्वातंत्र्य दिले असल्याचे डॉ. उपाध्याय यांनी सांगितले.

समाजातील समस्या एकमेकांशी सुसंगत असून त्याचे समाधान देखील सुसंगत असतात. समाजाच्या विकासासाठी सर्वांची गरज लक्षात घेऊन आंतर विद्याशाखीय अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहे. विद्यार्थी त्यांच्या आवडीचे विषय घेऊ शकतात. उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचे एकूण नोंदणी प्रमाण वाढावे याचा विचार एनइपीत करण्यात आला आहे. समाजामध्ये पारंपारिक ज्ञान असणारे अनेकजण आहेत. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी व्हावा म्हणून प्रथमच शिक्षण प्रणाली ज्ञान केंद्रीत असल्याचे डॉ. उपाध्याय यांनी सांगितले. सुमारे ३५ वर्षांनंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे. देशातील युवा पिढीच्या आकांक्षा आणि त्यांचे हित लक्षात घेऊन वेगाने बदलत असलेली जागतिक आर्थिक रचना आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संधी यांना तत्परतेने प्रतिसाद देणारे हे धोरण असल्याने त्याकडे वेगळ्या दृष्टीने बघणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञानात्मक प्रगतीबरोबरच त्यांच्या बौद्धिक, सामाजिक, भावनिक प्रगतीचा देखील विचार नव्या धोरणात करण्यात आला आहे. हे फार लवचिक धोरण आहे. या धोरणानुसार आंतरविद्याशाखीय शिक्षण हे महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षण रचनेचे वैशिष्ट्य आहे. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे शिक्षण येथील विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून त्या दृष्टीने आवश्यक शैक्षणिक रचना करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षक तसेच विद्यार्थ्यांचे आदान प्रदान या प्रणालीद्वारे होणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन हा विद्यापीठाच्या कामाचा मूळ गाभा राहील. आपल्याकडील समृद्ध असलेल्या संस्कृतीतील विविध भाषा, साहित्य लुप्त होत आहे. आपण किती समृद्ध संस्कृतीचा भाग आहोत हे विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान परंपरेच्या शिक्षणातून कळणार असल्याचे डॉ. उपाध्याय म्हणाल्या.

## विद्यार्थी केंद्रित धोरण : कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रित असल्याची माहिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी दिली. कुलगुरू डॉ. चौधरी यांनी चर्चासत्राचे उद्‌घाटन केले. पूर्वी अभ्यासक्रमामध्ये सहा अनिवार्य विषय घ्यावे लागत होते. वर्गात शिकायचे परीक्षा द्यायची आणि पदवी घ्यायची अशी प्रणाली होती. आवडत नसताना देखील काही विषय घ्यावे लागत होते. मात्र, एनईपीत तुमच्याकडे असलेल्या अंगभूत कौशल्याचे देखील क्रेडिट तुम्हाला मिळणार आहे. एका वर्षात ४० क्रेडिटचा अभ्यासक्रम राहणार असून ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम राहणार आहे. विद्यार्थी ३ वर्षात देखील अभ्यासक्रम पूर्ण करीत बाहेर पडू शकतो, असे त्यांनी सांगितले.

## विद्याशाखानिहाय चर्चा

या कार्यक्रमात विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेतील विविध अभ्यासक्रम तसेच विषय निवडीबाबत विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी यांनी माहिती दिली. वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेतील विविध अभ्यासक्रमाच्या बदललेल्या स्वरूपाबाबत अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांनी माहिती दिली. मानव विज्ञान विद्या शाखेतील बदल झालेली रचना अभ्यास क्रम याबाबत अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी माहिती दिली. तत्पूर्वी अडोलसंट हेल्थ अकॅडमीचे डॉ. लिनेश यावलकर यांनी करिअर कसे निवडावे? या विषयावर मार्गदर्शन केले. चर्चासत्रात मंजुषा पांडवकर यांनी गीत सादर केले. कार्यक्रमाचे संचालन मिलिंद भाकरे यांनी केले तर आभार श्रीकांत कोलते यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सखे सोबती तसेच नागरिकांची उपस्थिती होती.

## नवीन फौजदारी कायदे प्रत्येकाने आत्मसात करावे

### उपविभागीय पोलीस अधिकारी श्री बाबू रोहम यांचे प्रतिपादन

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात कार्यशाळा



भारतीय न्याय संहिता १ जुलैपासून लागू होत आहे. पोलिसांना आता जुने व नवीन कायद्याचा अभ्यास करून तपास करावा लागणार आहे. त्यामुळे नवीन फौजदारी कायदे प्रत्येकाने आत्मसात करावे, असे प्रतिपादन ग्रामीण पोलीस दलातील उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. बाबू रोहम यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय आणि नागपूर जिल्हा पोलिस (ग्रामीण) दल यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन फौजदारी कायदे- २०२४ या विषयावर महाविद्यालयात शनिवार, दिनांक २२ जून २०२४ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी श्री.रोहम मार्गदर्शन करीत होते.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी भूषविले. यावेळी मार्गदर्शक म्हणून काटोल येथील उपविभागीय पोलीस अधिकारी श्री बाबू रोहम, उच्च न्यायालयातील विधीज्ञ ॲड. संजय ब्रह्मे, प्रा. मृण्मयी कुकडे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना एसडीपीओ श्री बाबू रोहम यांनी नवीन व जुने कायद्याबाबत माहिती दिली. पोलीस दलात कार्यरत अधिकाऱ्यांना नवीन कायद्याबाबत माहिती व्हावी म्हणून पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी सातत्याने महाविद्यालयासोबत संपर्क करून या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. ज्ञान सातत्याने आत्मसात करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कार्यशाळेचे स्वागतपर भाषण करताना डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांनी पूर्वीचे कायदे इंग्रज राजवटीतील असल्याने बदलण्यात आले असल्याचे सांगितले. काळानुरूप कायदे बदलत राहतात. भारतीय न्यायसंहितेमुळे वसाहतीतून भारत न्यायाच्या कक्षेत येत आहे. सोबतच, लोकशाहीलापूरक पारदर्शक असे नवीन कायदे असल्याचे त्या म्हणाल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी प्रास्ताविक आणि भारतीय साक्ष अधिनियम (बीएसए) या विषयावर उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेला सर्व अधिकाऱ्यांचे त्यांनी सर्वप्रथम स्वागत केले. २० डिसेंबर २०२३ रोजी कायदे पारित झाले असले तरी सर्व संबंधितांना नवीन कायद्याचा अभ्यास करता यावा म्हणून वेळ देण्यात आला. त्यामुळे नवीन कायदे १ जुलैपासून लागू होत आहे. भारतीय ज्ञान संहिता हे अचानक आलेले कायदे नाहीत, असे डॉ. मोर म्हणाले. न्याय प्रक्रिया तीन कायद्याच्या चौकटीत राहणार असे दिसून येते. यासह अनेक विशेष कायदे देखील असल्याचे त्यांनी सांगितले. भावनेच्या आधारे नव्हे तर कायद्याच्या आधारे न्यायदान व्हावे असे नवीन कायद्याला अपेक्षित असल्याचे त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. यावेळी उच्च न्यायालयातील विधीज्ञ ॲड. संजय ब्रह्मे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) या विषयावर माहिती दिली. तर मृण्मयी कुकडे यांनी भारतीय न्याय संहिता या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन समन्वयक प्रा. ममता गोमासे यांनी केले तर आभार एसडीपीओ श्री. बाबू रोहम यांनी मानले. यावेळी कार्यशाळेला उपस्थित अधिकारी, पोलीस कर्मचारी व विद्यार्थ्यांनी तज्ज्ञांना प्रश्न विचारले. तज्ज्ञांनी समर्पक उत्तरे देत त्यांच्या प्रश्नांचे समाधान केले. कार्यशाळेला महाविद्यालयातील डॉ. अधरा देशपांडे, ग्रामीण पोलीस दलातील विधी अधिकारी ॲड. मंजुषा गिरडकर, नागपूर जिल्हा पोलीस (ग्रामीण) दलाच्या काटोल उपविभागातील विविध पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




Name – Nita Gautam Deb
College – RTMNU Nagpur University
Specialization – portrait painting




Name_ Poonam S. Watti
Class_ MFA 1st year
College_ Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Department of Fine arts, Nagpur.




Neha S. Awachit
Tittle - untitled
College -
Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Department of Fine arts, Nagpur.





Name : Girish Fulzele
Tittle - untitled
College -
Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Department of Fine arts, Nagpur.

## ललित कला विभागातील पाच विद्यार्थ्यांच्या चित्रांचे जहांगीर आर्ट गॅलरीत प्रदर्शन
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला व छंद मंदिर विभागातील पाच विद्यार्थ्यांच्या चित्रांची मुंबई येथील जहांगीर आर्ट गॅलरीत प्रदर्शनीसाठी निवड झाली आहे. मागील तीन वर्षांपासून विभागातील विद्यार्थ्यांची निवड होत असल्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान प्राप्त झाला आहे.

मुंबई येथील प्रतिष्ठित जहांगीर आर्ट गॅलरी वार्षिक मान्सून चित्रप्रदर्शन आयोजित केली जाते. अत्यंत प्रतिष्ठेच्या असलेल्या जहांगीर आर्ट गॅलरीच्या मान्सून चित्र प्रदर्शनीसाठी ललितकला व छंद मंदिर विभागाच्या विद्यार्थ्यांची निवड होणे हा विद्यापीठासाठी एक आनंदाचा क्षण आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख डॉ. संम्युक्ता थोरात यांच्या नेतृत्वात ललित कला व छंद विभागातील विद्यार्थी कला क्षेत्रातील नामवंत अशा संस्थांच्या कला पटलावर झळकत आहे. गिरीश फुलझेले, पूनम वट्टी, नेहा अवचित, सारीका चौधरी व नीता देब अशी निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांची नावे आहेत. या विद्यार्थ्यांना डॉ. स्नेहल लिमये, डॉ. सदानंद चौधरी तसेच श्री. नाना मिसाळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे

संपूर्ण भारतातून येणाऱ्या हजारो प्रवेशिकांमधून जहांगीर आर्ट गॅलरीच्या मान्सून चित्र प्रदर्शनीसाठी निवड केली जाते. या कठीण निवड प्रक्रियेतून निवडलेली पाचही विद्यार्थ्यांची चमू ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब आहे. विभागातील विद्यार्थी व शिक्षकांना वेळोवेळी योग्य दिशादर्शन करणाऱ्या विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी स्वतः जहांगीर आर्ट गॅलरीतील प्रदर्शनीला भेट देत विद्यार्थ्यांचे मनोभावे कौतुक व अभिनंदन केले. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी निवड झालेल्या पाचही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.







## मेहनत आणि इच्छाशक्तीने निश्चित ध्येय मिळवता येते

### प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन

### हेक्सावेअरच्या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये ९३ विद्यार्थ्यांची निवड

मेहनत आणि इच्छा शक्तीच्या बळावर जीवनात निश्चित ध्येय प्राप्त करता येते, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा रोजगार व प्रशिक्षण विभाग यांच्या वतीने महाराज बाग स्थित दीक्षांत सभागृह येथे हेक्सावेअर कंपनीचा प्लेसमेंट ड्राईव्ह गुरुवार, दिनांक 6 जून 2024 रोजी आयोजित करण्यात आला. प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना डॉ. दुधे बोलत होते. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये एकूण ९३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठात रोजगार व प्रशिक्षण विभाग सुरू करण्यात आला आहे. या विभागाच्या मार्फत आयोजित रोजगार मेळाव्यामधून अनेक विद्यार्थ्यांना आतापर्यंत रोजगार प्राप्त झाला आहे. शिवाय नामांकित राष्ट्रीय तसेच नवरत्न कंपन्यांचे रोजगार मेळावे देखील विद्यापीठात आयोजित केले जात आहे. माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या समवेत विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन हेक्सावेअर कंपनीच्या एचआर मॅनेजर सुरुची डंभारे, इला हायरिंगचे संचालक अंकित हिवरे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. दुधे यांनी विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा म्हणून दीड वर्षांपूर्वी विद्यापीठात रोजगार व प्रशिक्षण विभाग सुरू केल्याची माहिती दिली. यावेळी रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### ९३ विद्यार्थ्यांची निवड

हेक्सावेअर कंपनीच्या वतीने कस्टमर सपोर्ट एक्झिक्युटिव्ह या पदाकरिता या मुलाखती आयोजित करण्यात आल्या आहेत. मुलाखतीकरिता एकूण ८९२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २६४ विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित होते. मुलाखतीनंतर एकूण ९३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. हिंदी करिता ३४, आंतरराष्ट्रीय ८, डोमेस्टिक (चॅट) १८ तर डोमेस्टिक (व्हाईस) ३३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय (व्हाईस) पदाकरिता प्रती वर्ष ३.१ लाख रुपये, डोमेस्टिक (चॅट) १.९२ लाख रुपये तर डोमेस्टिक (व्हाईस) १.८ लाख रुपये मिळणार आहे. मुलाखतीच्या यशस्वीतेकरिता आयक्यूएसी विभागातील अनिकेत गभणे यांचे देखील सहकार्य लाभले.

## विद्यापीठात इनव्हेंटिस रिसर्च कंपनीचा प्लेसमेंट ड्राईव्ह

### रोजगार व प्रशिक्षण विभागाचे आयोग



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात इनव्हेंटिस रिसर्च कंपनी प्रायव्हेट लिमिटेडचा प्लेसमेंट ड्राईव्ह घेण्यात आला. महाराज बाग स्थित दीक्षांत सभागृहात सोमवार, दिनांक २४ जून २०२४ रोजी आयोजित प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाने केले. या प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये दहा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

इनव्हेंटिस रिसर्च कंपनी प्रायव्हेट लिमिटेडने ट्रेनी केमिकल आरएनडी या पदाकरिता आयोजित प्लेसमेंट ड्राईव्ह करिता एकूण ५९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. इंडस्ट्रियल, ॲनालिटिकल किंवा ऑर्गॅनिक केमिस्ट्री या विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.एससी.) चे शिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी या पदाकरिता पात्र होते. ट्रेनी केमिकल आरएनडी या पदाकरिता मुलाखतीसाठी आलेल्या पैकी दहा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यामधील पाच विद्यार्थी हे विद्यापीठाच्या शैक्षणिक परिसरातील असून अन्य ५ महाविद्यालयात आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर

विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या प्लेसमेंट ड्राईव्हला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कंपनीच्या एचआर मेघा खापेकर, राहुल बेलसरे, आरएनडी मॅनेजर डॉ. गणेश जाधव व डॉ. राघव साहू यांच्या पथकाकडून मुलाखत प्रक्रिया राबविण्यात आली. विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांनी या मेळाव्याचे नियोजन केले होते.





## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनातील विद्यार्थ्यांची गुरुकुंज मोझरीला क्षेत्रभेट
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन विभागातील विद्यार्थ्यांनी अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथे क्षेत्रभेट दिली. या क्षेत्रभेट अभ्यास दौऱ्यातून विद्यार्थ्यांनी गुरुकुंज मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विषयी तसेच विविध विभागांची माहिती घेतली.

एम.ए. करीत असताना राष्ट्रसंतांच्या प्रत्यक्ष कर्मभूमीला भेट देण्याची व त्यांच्या कार्याची आणि श्री गुरुकुंज आश्रमातील विविध विभागांची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी हा क्षेत्रभेटी मागील हेतू होता. राष्ट्रसंतांनी प्रत्यक्ष कृतीवर भर दिला. त्याची जाणीवही यातून विद्यार्थ्यांना झाल्यास त्यांना महाराजांच्या साहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व अधिक पटणार होते. शिक्षण घेताना अभ्यास दौऱ्याला विशेष महत्त्व असते. या क्षेत्रभेटी अंतर्गत गुरुकुंज आश्रमातील समाधी दर्शन, सामुदायिक प्रार्थना मंदिर, ज्ञानयोग मंदिर, मानव सेवा छात्रालय, श्रीगुरुदेव अनाथाश्रम, श्रीगुरुदेव वृद्धाश्रम, श्रीगुरुदेव प्रकाशन विभाग, श्रीगुरुदेव अध्ययन केंद्र, श्रीगुरुदेव प्रचार विभाग, श्रीगुरुदेव आयुर्वेदिक महाविद्यालय, श्रीगुरुदेव विद्या मंदिर, श्रीगुरुदेव अध्यापन केंद्र आदी सर्वच विभागांची माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. येथील सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या संचालक मंडळाच्या अध्यक्षा सौ पुष्पाताई बोंडे होत्या. विशेष अतिथी म्हणून डॉ. विजयराव बोंडे आणि माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे या होत्या. यावेळी ह.भ.प. रायजीप्रभू शेलोटकर महाराज यांनी श्री गुरुकुंज आश्रम व महाराजांविषयी सविस्तर माहिती सांगितली. क्षेत्रभेटीला डॉ. कामडी, प्रा. कुमरे, प्रा. जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नरेंद्र राऊत यांनी केले तर आभार श्री माणिकदादा बेलूरकर यांनी मानले. संचालन प्रा. सौ. खाडे यांनी केले. यावेळी गुरुकुंज आश्रमात विचारधारा विभागातील विद्यार्थी, प्रा. जगताप, सौ. सोनारे, सौ. पिंजरकर, सौ. शेडा, श्री. राठोड, भोजन विभाग प्रमुख श्री. चर्जन, श्री. बावणे तसेच सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. प्रा. राऊत यांनी यावेळी गोडप्रसाद वाटप केला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रवंदनेने झाली. यानंतर दासटेकडी, राष्ट्रसंतांचे जन्मस्थळ यावली शहिद व आजोळ वरखेड यास्थळी विद्यार्थ्यांनी भेट दिली.

# 'एआयच्या युगात कलावंतांचे भविष्य'वर परिसंवाद
## ललित कला विभाग, छंद मंदिर व नारद फाउंडेशनचे आयोजन







'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) च्या युगात कला- कलावंतांचे भविष्य' या विषयावर ललित कला विभागात शनिवार दिनांक १ जून २०२४ रोजी परिसंवाद घेण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ललित कला विभाग व छंद मंदिर आणि नारद फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ललित कला विभाग व छंद मंदिर विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी परिसंवाद कार्यक्रमाची अध्यक्षता केली. प्रमुख वक्ते म्हणून श्री हर्षद सालपे उपस्थित होते. कला आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या संगमावर उभ्या असलेल्या आपल्या युगात, 'एआय (AI) म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा कला आणि कलावंतांवर होणारा परिणाम' या विषयावर आयोजित परिसंवादात श्री हर्षद सालपे व विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी विचार व्यक्त केले. तंत्रज्ञानातील बदल कसे कलाक्षेत्रावर परिणाम करत आहेत, हे स्पष्ट करताना हर्षद सालपे यांनी एआयमुळे कलाक्षेत्रात नवीन संधी निर्माण होत असल्याचे सांगितले. मात्र, त्याचवेळी काही आव्हानेही उभी राहत आहेत. भविष्यात कलाकाराने स्वतःचे ब्रॅंडींग करणे फार आवश्यक आहे. अन्यथा कलाकार कालबाह्य झाल्या शिवाय राहणार नाही, असे पुढे बोलताना सालपे म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना डॉ संयुक्ता थोरात यांनी एआय आजच्या युगात कसे महत्त्वाचे आहे, याबाबत माहिती दिली. एआय कला व कलाकारांच्या फायद्याचेच आहे. केवळ त्याचा दुरोपयोग टाळून योग्य उपयोग करण्याचे शिक्षण आपण घेतले पाहीजे, असे मौलिक विचार डॉ. थोरात यांनी व्यक्त केले. भविष्यात ही असे विविध कार्यक्रम नारद संस्थेतर्फे आयोजित करण्यात येतील. कार्यक्रमाचे संचालन श्री विजय जथे ह्यांनी केले तर आभार नारद फाउंडेशनचे उपाध्यक्ष श्री पियूष धुमकेकर यांनी मानले.



# विद्यापीठ ललित कला विभागात
## वृक्षारोपण

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभाग व छंद मंदिर येथे बुधवार दिनांक ५ जून २०२४ रोजी वृक्षारोपण करण्यात आले. अधिसभा सदस्य श्री दिनेश शेराम आणि ललित कला विभाग व छंद मंदिर विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी पर्यावरणाच्या संतुलनासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लावण्याचे आवाहन उपस्थितांना केले. यावेळी विद्यापीठाचे अधिसभा सदस्य श्री दिनेश शेराम, विभागातील शिक्षकवृंद डॉ. सदानंद चौधरी, प्रा. पियुष धुमकेकर, प्रा. हर्षद सालपे, उज्ज्वला धंदरे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. परिसरात पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करून पर्यावरणाचा संदेश देण्यात आला.



# गांधी विचारधारा विभागात पर्यावरण दिवस उत्साहात

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गांधी विचारधारा विभागात पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. एलएडी चौक स्थित गांधीनगर येथील गांधी विचारधारा विभागात बुधवार, दिनांक ५ जून २०२४ रोजी पार पडलेल्या कार्यक्रमात उपस्थितांना रोपटे वाटप करण्यात आले.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनात आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी पर्यावरण प्रथम संस्थेचे अध्यक्ष डॉ. अपरूप अदावतकर, सनदी लेखापाल व इंडिया पिस सेंटरचे डॉ. तेजिंदरसिंह रावळ, डॉ. अरुण मानकर, गांधी विचारधारा विभाग प्रमुख श्री. प्रमोद वाटकर, मधमाशी पालन तज्ज्ञ अभियंता विजय भगत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. आंतर विद्याशाखिय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांची पर्यावरण संबंधातील झेप किती मोठी होती याबाबत विविध उदाहरणे देत माहिती दिली. संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकास ध्येयावर देखील महात्मा गांधीजींच्या विचारांची छाप स्पष्टपणे असल्याचे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी पर्यावरण तज्ञ डॉ. अरुण मानकर आणि डॉ. अपरूप अडावतकर यांनी उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरण म्हणजे काय ?. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी ते काय करू शकतात, हे सहज, सोप्या भाषेत, दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन समजावून सांगितले. सर्वांनी पर्यावरणाप्रती कटिबद्ध राहण्याची प्रतिज्ञा घेतली. गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांनी प्रास्ताविक केले. त्यात त्यांनी सर्वांना या विभागाच्या विविध कार्यात सहभागी होऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते पर्यावरण प्रथम संस्थेचे अध्यक्ष डॉ. अपरूप अदावतकर यांनी 'पृथ्वीचे पर्यावरणीय आरोग्य सांभाळण्यासाठी महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान" या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी त्यांनी पर्यावरणाची झालेली क्षती, त्याची कारणे व उपाययोजना यांचा उहापोह केला. पर्यावरणाच्या संदर्भात महात्मा गांधी यांचे विचार किती प्रगत होते आणि आजही कसे सुसंगत असल्याचे सांगितले. सनदी लेखापाल इंडिया पिस सेंटरचे डॉ. तेजिंदर सिंह रावळ यांचेही प्रासंगिक भाषण झाले. त्यांनी पर्यावरण समजून घेऊन, त्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे महत्त्व याबद्दल चर्चा केली व विभागाला या कामासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

शहरातील प्रसिद्ध मधमाशी पालन तज्ज्ञ, अभियंता विजय भगत यांनी मधमाशांचे पर्यावरणातील स्थान या विषयावर उपस्थितांचे उद्बोधन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.अरुण मानकर यांनी केले तर आभार डॉ. शानूर मिर्झा यांनी मानले. या कार्यक्रमाला शालेय विद्यार्थी, विभागाचे आजी व माजी विद्यार्थी, प्राध्यापक, शहरातील पर्यावरणप्रेमी नागरिक आवर्जून उपस्थित होते.



# विद्यापीठात होणार माजी शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मेळावा

## शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने माजी शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मेळावा आयोजित केला जाणार आहे. या मेळाव्या संदर्भात पूर्व तयारी बैठक जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात मंगळवार, दिनांक ११ जून २०२४ रोजी सकाळी पार पडली.

बैठकीचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भूषविले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, शताब्दी महोत्सव कक्षाचे सहसमन्वयक डॉ. संतोष कसबेकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. चौधरी यांनी सर्वांचा सन्मान व्हावा या उद्देशाने या माजी शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मेळाव्याचे आयोजन १० जुलै २०२४ रोजी होत असल्याचे सांगितले. सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख व अधिकाऱ्यांनी त्यांच्या संपर्कातील माजी शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती गोळा करीत त्यांना कार्यक्रमात सहभागी करून घेण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. चौधरी यांनी बैठकीत केले. बैठकीचे प्रास्ताविक करताना शताब्दी महोत्सव कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष कसबेकर यांनी माजी शिक्षक, कर्मचारी मेळाव्याच्या आयोजनामगील भूमिका विशद केली. सोबतच मेळाव्याचे नियोजन करण्याबाबत सर्वांना सूचना करण्याचे आवाहन केले. प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी मेळावा यशस्वी करण्याचे आवाहन केले. बैठकीला विज्ञान व तंत्रज्ञान अभ्यास विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांच्यासह विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, संचालक व अधिकारी उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. बैठकीचे यशस्वी नियोजन शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले यांनी केले.



## विद्यापीठ भूगर्भशास्त्र विभागात पोपटाला जीवनदान

पोपटा पोपटा बोलतोस गोड,

पण झालास रोड,

खा ना जरा पेरूची फोड"

वैशाख वणव्यात तहान आणि भुकेने व्याकुळ झालेल्या पोपटाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागात जीवनदान मिळाले. विद्यार्थ्यांसह विभाग प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे यांनी या पोपटाला जीवनदान दिले.

अशा बालगितामधून दिसणारा पोपट पक्षी आपण सर्वांना ठावूक आहे. हिरव्याकंच वृक्षांवर बसून आपल्या लाल लाल चोचीने फळं खाणारा आणि मधुर बोल बोलणारा पोपट माहिती आहे. कधी पोपटाचे थवे उडताना दिसणार तर कधी अख्खं झाड पोपटांनी झाकून टाकल्याचं दृश्य बघायला मिळणार आणि श्रावणात तर अशी दृश्य हमखास दिसणारच! परंतु सर्व ऋतू सारखे नसतात. प्राणी आणि पक्षांनाही या ऋतूचक्रापासून सुटका नाही. वैशाख वणव्यात भर दुपारी भल्या भल्याची दमछाक होते तिथे छोट्या पाखरांची काय कथा? राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागाजवळ शनिवार दुपारी असाच एक पोपट उन्हानं बेजार होवून खाली पडताना कु. कृतिका जांगडे नावाच्या विद्यार्थिनीला दिसला. तिने लगबगीने धावत जावून त्या पक्षाला रुमालात गुंडाळून विभाग प्रमुख प्रा. किर्तिकुमार रणदिवे यांच्या चेंबर मध्ये आणले. प्रा. रणदिवे, कृतीका, प्रतीक गोडबोले आणि श्री भगत यांनी त्या पोपटाला पाणी आणि ड्राय फ्रूटस दिले. सुरुवातीला झटापट करणारा पोपट हळूहळू आश्वस्त झाला. मानवतेहून मोठे शिक्षण कोणतेच नसते व ते कोणत्याच अभ्यासक्रमात शिकविले जात नाही, ते ज्याचे त्यांनी आचरण करावयाचे असते. याचा वेळोवेळी प्रत्यय येतो. या निरागस पोपटाच्या रूपाने पुन्हा एकदा नैतिकता अधोरेखित झाली आहे.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राजश्री शाहू महाराज जयंती संपन्न

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ छत्रपती राजश्री शाहू महाराज यांची जयंती बुधवार, दिनांक २६ जून २०२४ रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात विद्यापीठाच्या वतीने शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री. प्रदीप बिनीवाले व सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री. गणेश कुमकुमवार यांच्या शुभहस्ते छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. यावेळी सर्वश्री युडीसी शैलेश राठोड, नितीन खरबडे, अनिल खरे, कवडू भोयर, प्रदीप झोड, शीतल शेटे, कार्तिक हरडे, आसिफ शेख, प्रणय, यांच्यासह अन्य उपस्थित होते.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सायन्स जर्नलचे विमोचन

## कुलगुरू डॉ सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते विमोचन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सायन्स जर्नलचे विमोचन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते बुधवार, दिनांक १९ जून २०२४ रोजी करण्यात आले. कुलगुरू कार्यालयात आयोजित कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने विज्ञान विषयातील संशोधनपर लेख असलेले पीअर पुनरावलोकन आणि संदर्भित जर्नल प्रत्येक वर्षी प्रकाशित केले जाते. कुलगुरू कार्यालयात आयोजित एका कार्यक्रमात २०२३ मधील संशोधनपर लेखावर आधारित सायन्स जर्नलचे विमोचन करण्यात आले. सायन्स जर्नलचे संपादन एडिटर इन चीफ म्हणून भौतिकशास्त्र विभागातील प्रोफेसर डॉ. संजय ढोबळे व असोसिएट एडिटर इन चीफ म्हणून भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे यांनी केले. कुलसचिव डॉ. राजू हिवसे हे सायन्स जर्नलचे प्रकाशक आहेत. संपादक मंडळामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, औषधी निर्माणशास्त्र विभागातील डॉ. प्रमोद खेडेकर, डॉ. प्रकाश इटनकर, डॉ. निशिकांत राऊत, डॉ. दादासाहेब कोकरे, जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे डॉ. संतोष जाजू, प्रियदर्शनी इंजिनिअरिंग कॉलेज हिंगणा येथील डॉ. एस. ए. ढाले, दादासाहेब कन्नमवार इंजिनिअरिंग कॉलेज नंदनवन येथील डॉ. सी. सी. हांडा, इंदिरा महाविद्यालय कळंब येथील डॉ. कैलास नेमाडे यांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या मुद्रणालयाचे प्रकाशन अधिकारी श्री. प्रवीण गोतमारे हे सायन्स जर्नलचे मुद्रक आहेत. विमोचन कार्यक्रमाला संपादन मंडळातील सर्व सन्माननीय सदस्यांची उपस्थिती होती.



# विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचारी निरोप समारंभ

## सेवानिवृत्ती हा भावनिक क्षण - डॉ. राजेश सिंह

अनेक वर्षाच्या दीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त निमित्त होत असलेला निरोप समारंभ हा भावनिक क्षण असल्याचे प्रतिपादन विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश सिंह यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा निरोप समारंभ जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात शनिवार, दिनांक २९ जून २०२४ रोजी पार पडला. या कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून डॉ.राजेश सिंह मार्गदर्शन करीत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश सिंह होते तर प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, महाविद्यालयीन विभागाचे उपकुलसचिव डॉ. रमण मदने यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. कल्पना शरद जाधव, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ विभागातील श्री सतीश हरिभाऊ पुसतकर, आस्थापना विभागातील श्री रामदास विश्वनाथ जवंजाळ, विद्यापीठ छंद मंदिरातील श्री प्रमोद महादेवराव देशमुख, अर्थशास्त्र विभागातील श्री गणेश कवडूजी भलावी, मुद्रण व प्रकाशन विभागातील श्री गोविंदराव विठोबा जिभकाटे, ज्ञानस्त्रोत केंद्रातील श्री शिवराम बलदेव घाटोडे, स्थावर विभागातील श्री अनिलकुमार किसनराव मून, पदव्युत्तर मानव्यशास्त्र विभागातील श्री शंकर सदाशिव मेंडके, रसायनशास्त्र विभागातील श्री रमेश गणपत मसराम, विद्यार्थी वसतिगृहातील श्री. अनिल मनोहर खोटपाल व अकॅडमीक स्टाफ कॉलेज येथील श्री नाना लोखंडे यांचा यामध्ये समावेश आहे. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना डॉ. राजेश सिंह यांनी कर्मचारी म्हणून आपले अस्तित्व काहीच नाही. मात्र, आपण ज्या ठिकाणी कार्य करतो, त्या संस्थेमुळे आपली ओळख निर्माण होत असल्याचे सांगितले. अनेकांनी जीवनातील मोठा कालखंड विद्यापीठाकरिता दिला असल्याचे डॉ. सिंह यांनी सांगितले. छंद मंदिर विभागातील श्री प्रमोद देशमुख यांनी मनोगत व्यक्त करताना अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यापीठाने अनेक सुवर्णसंधी कार्य करीत असताना दिल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन दीपक घोडमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.




# भारतीय ज्ञान परंपरेत योग महत्वपूर्ण - डॉ. कोरेटी

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात शुक्रवार, दिनांक २१ जून २०२४ रोजी सकाळी ८ वाजता मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भारतीय ज्ञान परंपरेत योगासनाला महत्त्वपूर्ण स्थान असल्याचे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी योगासनाचे प्रात्यक्षिक सादर केले.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आयआयएल संचालक तथा विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. राजेश सिंह, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य धनश्री लेकुरवाळे, प्रशिक्षक डॉ. तेजसिंह जगदाळे व डॉ. आदित्य सोनी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी योगाभ्यासाने आरोग्य उत्तम राहते असे सांगितले. राष्ट्रीय स्तरावरील आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या महिला व पुरुष संघांनी सुवर्णपदक प्राप्त केल्याने विद्यापीठाच्या वतीने त्यांनी दोन्ही संघाला शुभेच्छा दिल्या. विद्यापीठाच्या योगासन पथकाचे प्रशिक्षक डॉ.  तेजसिंह जगदाळे यांनी उपस्थितांना योगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. डॉ. जगदाळे यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे उपस्थितांनी योगासनाची विविध आसने केली. सुरुवातीला शारीरिक व्यायाम करण्यात आला. त्यानंतर ताडासन, पादहस्थासन, वक्रासन मक्रासन, भुजंगासन, पवनमुक्तासन, शवासन, कपालभाती, शितल प्राणायाम, अनुलोमविलोम, भ्रामरी प्राणायाम, योगाचे आदी विविध आसने केली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. देवेंद्र वानखडे यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी मानले. कार्यक्रमाला अधिष्ठाता, विविध विभागांचे संचालक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक सादर

आंतरराष्ट्रीय योगपटू तथा विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य धनश्री लेकुरवाळे यांच्या पथकातील विद्यार्थ्यांनी योगासनाचे सुंदर प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या योगासनाच्या प्रात्यक्षिकाने उपस्थित त्यांना मंत्रमुग्ध केले.]

### सुवर्णपदक विजेत्या संघांचा सत्कार

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावर आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये सुवर्णपदक प्राप्त करून देणाऱ्या महिला व पुरुष संघातील सदस्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथींच्या हस्ते योगासन महिला संघातील कल्याणी चुटे, छकुली सेलोकार, सुहानी गिरीपुंजे, रचना अंबुलकर, अलिषा गायमुखे, श्रिया दामडे, तर पुरुष संघातील वैभव श्रीरामे, हर्षल चुटे, वैभव देशमुख, प्रणय कंगाले, ओम राखडे, वंश खिंची तसेच प्रशिक्षक डॉ. तेजसिंह जगदाळे व ॲथलेटिक संघाचे प्रशिक्षक डॉ. आदित्य सोनी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन डॉ आदित्य सोनी यांनी केले.













# मल्लखांब सारख्या पारंपारिक खेळाला गतवैभव प्राप्त करुन देणे गजरेचे

## पहिल्या विदर्भस्तरीय मल्लखांब परिसंवादात वक्त्यांनी मांडले विचार

क्रीडा भारती नागपूर महानगर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने पहिल्या विदर्भस्तरीय मल्लखांब संमेलनाचे आयोजन नुकतेच करण्यात आले. मल्लखांब: काल, आज आणि उद्या या विषयावर चर्चासत्राचे आयोजन देखील करण्यात आले. मल्लखांब या खेळाला गतवैभव प्राप्त करुन देण्याची गरज असल्याचे मत परिसंवाद उपस्थित वक्त्यांनी व्यक्त केले. यावेळी प्रमुख वक्ता म्हणून डॉ. धनंजय वेळुकर, महाराष्ट्र क्रीडा भारतीचे अध्यक्ष डॉ. अनिल करंवदे, क्रीडा भारतीचे प्रसन्न हरदास, क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलतांना डॉ. वेळुकर म्हणाले, मल्लखांब खेळाचे क्रीडा साहित्यात कालानुरुप बदल होत आहे. आता लाकडी मल्लखांबवर स्पर्धा होतात. पुढे या मटेरिअलमध्ये बदल होवू शकतो, त्यासाठी खेळाडूंनी तयार असावे. आधी वेताचा दोर लावून महिला खेळाडू प्रदर्शन करायचे आता साध्या दोरावर प्रदर्शन करण्यात येते. पूर्वी सकाळ सायंकाळ असे दोन सत्रात मल्लखांबचा सराव व्हायचा आता मात्र रात्री उशीरापर्यंत सराव चालतात. काळानुरुप मल्लखांबपटूंच्या गणवेशात देखील बदल झाला आहे. आता स्टेज शो सुद्धा ही खेळाडू करीत आहे. तर डॉ. करवंदे म्हणाले, मल्लखांब खेळ हा सर्वांगसुंदर व्यायाम आहे. मुलींचा बांधा सुडौल ठेवण्यासाठी हा उपयुक्त व्यायाम आहे. तर मुलांना कुठलेही जीम वर्कआऊट न करता सिक्स पॅक मल्लखांबमुळे तयार करता येतात. रक्ताभिसरण वाढणे, चपळता वाढणे, गतिशीलता वृद्धींगत होणे आदी लाभ या व्यायाम प्रकारातून मिळतात. महत्वाचे म्हणजे खेळाडूंमध्ये प्रचंड आत्मविश्वास निर्माण होतो.

महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटनेचे अनिल नागपुरे पंच म्हणून मत मांडले मल्लखांब खेळाच्या पंचगिरीत मोठा बदल आताच्या काळात झाला आहे. पुढील काळात अधिक बदल अपेक्षित आहे. संध्याचे काळात इलेक्ट्रॉनिक साहित्याचा वापर अद्याप या खेळात नाही. मात्र २०३६ सालचे ऑलिम्पिक खेळांमध्ये या खेळाचा समावेश अपेक्षित असल्याने इलेक्ट्रॉनिक्स साहित्याचा वापर होण्याची शक्यता आहे. मल्लखाब खेळाचे पंचासाठी अधिक कार्यशाळेचे आयोजन क्रीडा संघटनांमार्फत व्हावे. माजी खेळाडूंनी खेळातून निवृत्ती घेतल्यावर मल्लखांब खेळाचे पंच म्हणून काम करावे. तांत्रिक पंचाचे मानधनात मोठी वाढ करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कुणाल दातारकर यांनी खेळाडू म्हणून भूमिका मांडली मल्लखांब खेळाचे फायदे शलेय अभ्यासक्रमात शिकवायला हवे, महाविद्यालयीन स्तरावर सुद्धा खेळाची आवड निर्माण व्हावी यासाठी खेळाचे आयोजनात व्यावसायिकता आणून त्याचे ब्रँडींग होणे गरजेचे आहे. मल्लखांबच्या सरावाने पुरुष व महिलांच्या शरीराचा बांधा मजबूत होतो. खेलो इंडिया विद्यापीठ गेम्समध्ये मल्लखांबचा समावेश झाल्याने त्याची लोकप्रियता वाढली आहे. या स्पर्धा टीव्हीवर दाखविल्याने खेळाडूंना मोठी प्रसिद्धी मिळाली आहे. आयपीएलच्या धर्तीवर या खेळाचे आयोजन झाल्यास युवावर्ग मोठ्या प्रमाणात या खेळाकडे आकर्षित होतील. मल्लखांब खेळांमध्ये पुरस्कार राशी अगदी नगण्य असून त्यात वाढ होणे गरजेचे आहे.

याप्रसंगी बोलतांना प्रसन्न हरदास म्हणाले, क्रीडा भारती देशी खेळांना प्रोत्साहित करु इच्छितो, नियमित खेळण्यात येणार ऑलिम्पिक व नॉन ऑलिम्पिक खेळांच्या सोबतीनेच देशी खेळांना लोकप्रियता मिळवून देणे आवश्यक आहे. शाळा व महाविद्यालयातील क्रीडा शिक्षकांशी समन्वय व संपर्क साधून क्रीडा भारती या खेळाला गत वैभव प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्नरत आहे. या खेळाचा इतिहास, नियमावली, तंत्र आणि कौशल्य यावर लिखाण व्हावे यासाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या परिसंवादाचे संचालन आनंदवन महाविद्यालय वरोराचे डॉ. तानाजी बायस्कर यांनी केले. अतिथीचा परिचय अर्चना कोटटेवार सहमंत्री ,क्रीडाभारती यांनी करून परिसंवादाची संकल्पना डॉ. शरद सुर्यवंशी यांनी मांडली, आभार संतोष साकल्ले यांनी मानले.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाला कांस्यपदक रुतिका किन्हेकर सर्वोत्कृष्ट खेळाडू

ग्वाल्हेर येथील आयटीएम विद्यापीठाच्या यजमानपदाखाली झालेल्या ऑल इंडिया फ्लोअर बॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने दमदार कामगिरी करीत कांस्यपदक प्राप्त केले. स्पर्धेत कर्णधार ऋतिका किन्हेकर हिच्या नेतृत्वात खेळणाऱ्या नागपूर विद्यापीठाच्या संघाने पहिल्याच लढतीपासून विजयी कामगिरी केली.

सलामीच्या लढतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने केबीसी विद्यापीठाचा ७-० ने धुव्वा उडवित मोठ्या विजयाची नोंद केली. यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाकडून कर्णधार ऋतिकाने चार तर शर्वरीने दोन व महेकने एक गोल नोंदवित संघाच्या विजयात मोलाची भुमिका बजाविली. तर दुसऱ्या लढतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ महिला संघाने मांड्या विद्यापीठाचा ३-१ पराभव केला. यात ऋतिका, शर्वरी मुळे, दुर्गा बोरकुटेने प्रत्येकी एक गोल नोंदविला. यानंतर तिसऱ्या लढतीत महिला संघाने एमडीयू विद्यापीठाचा ३-१ ने विजय नोंदिवत पुढील फेरी गाठली. यानंतर तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत महिला संघाने चिंचूगिरी विद्यापीठाचा पराभव करीत तिसरे स्थान प्राप्त केले. स्पर्धेत दमदार कामगिरी करणाऱ्या कर्णधार ऋतिका किन्हेकरला बेस्ट स्कोअरर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेत सर्वाधिक पाच गोल विद्यापीठाची कर्णधार ऋतिका किन्हेकर हिने तर तीन गोल शर्वरी मुळे, दोन गोल महेक सिंग आणि एक गोल दुर्गा बोरकुटेने केले. नागपूर विद्यापीठाच्या महिला संघात कर्णधार ऋतिका किन्हेकर (पीजीटीडी ऑफ हिंदी रातुम नागपूर), गौरी रुद्रकार (केडीके अभियांत्रिकी कॉलेज), खुशाली लाड (एमजी पारशिवनी), शर्वरी मुळे (धनवटे नॅशनल कॉलेज), सेजल ढोरे, सीमा (व्हीएन शारी. शिक्षण कॉलेज), दुर्गा बोरकुटे (उषाबेन कॉलेज), प्रिया पांडे, महेक सिंग (व्हीएमव्ही कॉलेज), दिशा नातानी (जीएस कॉमर्स वर्धा). राखीव : रेणुका सहस्त्रबुद्धे (प्रियदर्शनी कॉलेज), अंजली कोसरे (एमजी कॉलेज, पारशिवणी), एकता नायगडे (उषाबेन कॉलेज), पुजा गायकवाड (नागपूर शारी. शिक्षण कॉलेज). तर पुरुष गटात संघाला एकच विजय नोंदविता आला. यात पहिल्या लढतीत पुरुष संघाने मांड्या विद्यापीठाला ४-० अशा गोलने नमविले. मात्र दुसऱ्या लढतीत बंगलोर विरुद्ध या संघाला ४-३ असा पराभव स्वीकारावा लागला. स्पर्धेत सर्वाधिक चार गोल समीर देवधरने तर दोन गोल आरीफ अंसारी, रितिक कावराने एक गोल केला.

पुरुष संघात कुणाल कावरे (एसबी सिटी कॉलेज), नरेंद्र चटप (एमजी कॉलेज, पारशिवणी), समीर देवधर(तायवाडे कॉलेज, कोराडी), आरीफ अंसारी (नागाजी महाराज शारी. शिक्षण कॉलेज), सक्षम भंडारी (प्रेरणा कॉलेज), रितीक कावरा (एनएसएस महा.), पार्थ नागरे (आयडीसीपीई), रोहन सावरा (व्हीएमव्ही, जेएमटी कॉलेज), अमय आवथरे (ताई गोळवलकर कॉलेज, रामटेक), शुभम साहू (एसएस मनीयार कॉलेज), मीत त्रिवेदी, मान त्रिवेदी (जीएस कॉमर्स, वर्धा), रामनवास मांडळकर (व्हीएन शारी. शिक्षण). राखीव - ताराचंद (व्हीएन शारी. शिक्षण कॉलेज) यांचा समावेश होता. दोन्ही संघासोबत प्रशिक्षक म्हणून स्नेहल भगत, दीक्षा जवळकर, सागर भगत तर संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. सुरेखा धात्रक मोलाची भुमिका बजाविली. विद्यापीठाच्या महिला संघाने केलेल्या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच विद्यापीठाचे माननीय कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.





# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ कराटे सेंटरचे खेळाडू दहावीत चमकले

डोळ्यात स्वप्न आणि मेहनत करण्याची तयारी असली की मग कोणीही असो यश हे निश्चितच मिळते. मात्र परिस्थिती आपल्या विरुद्ध आहे आणि अशा परिस्थितीत यश खेचून आणणे हे फार कमी विद्यार्थ्यांना जमते. त्यातल्या त्यात जर तो खेळाडू असेल तर त्याला सराव आणि अभ्यास अशी दुहेरी कसरत करुन यश मिळवावे लागते. त्यामुळे बहुतांश खेळाडूंना चांगले गुण क्वचितच मिळतात. मात्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कराटे केंद्राचे खेळाडू अपवाद ठरले आहे. या केंद्राच्या खेळाडूंनी इयत्ता दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होत घवघवीत यश संपादन केले.

नूतन भारत विद्यालय शाळेचे हे विद्यार्थी आहेत. यात आयुष तेजराम कोसरेने ८३.८० टक्के प्राप्त केले आहे. त्याने साऊथ एशिया चॅम्पयनशिपमध्ये १७ वर्षाखालील काता, कुमेते या प्रकारात २ ब्राँझ मेडल मिळवले. वडील नसताना तसेच आई केक व्यवसायिक आहे. यातच आयुषने हे यश प्राप्त केले. इंडो काँटिनेंटल इंटरनॅशनल कराटे चॅम्पयनशिपमध्ये द्विज धम्मानद गजभिये याने कुमिते प्रकारात रौप्यपदक पटकाविले. त्याने दहावीत ८३.६० टक्के गुण मिळविले. आई नसताना हलाखीच्या परिस्थिती त्याने हे यश प्राप्त केले. याशिवाय ग्रामीण भागातील खेळाडू उत्तम संजय वनवेने दहावीत ७५ टक्के यश मिळविले. त्याने कुमेते या प्रकारात ब्राँझ मेडल मिळविले. त्याला वडील नसून आई शेतमजुरी करते अशा परिस्थितीत त्याने यश मिळविले. द्विज आणि उत्तम खराशी लाखांदूर तालुक्यातील रहिवासी आहे. हे सर्व खेळाडू राज बन्सोड, विजय घिचरे यांच्या मार्गदर्शनात सराव करतात.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने छोटेखानी समारंभ घेण्यात आला. पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अथलेटिक्स तांत्रिक समिती अध्यक्ष प्राचार्य डॉ. विवेकानंद सिंग, नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सहसचिवद्वय राम वाणी, अर्चना कोट्टेवार आदी उपस्थित होते.

# नागपूर विद्यापीठाचा महिला संघ उपांत्यफेरीत



ग्वाल्हेर येथील आयटीएम विद्यापीठाच्या यजमानपदाखाली १२ ते १५ जून दरम्यान सुरु असलेल्या ऑल इंडिया फ्लोअर बॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने दमदार कामगिरी करीत उपांत्यफेरीत प्रवेश केला आहे.

स्पर्धेत कर्णधार ऋतिका किन्हेकर हिच्या नेतृत्वात खेळणाऱ्या नागपूर विद्यापीठाच्या संघाने पहिल्याच लढतीपासून विजयी कामगिरी सुरु केली. सलामीच्या लढतीत नागपूर विद्यापीठाने केबीसी विद्यापीठाचा ७-० ने धुव्वा उडवित मोठ्या विजयाची नोंद केली. यात नागपूर संघाकडून कर्णधार ऋतिकाने चार तर शर्वरीने दोन व महेकने एक गोल नोंदवित संघाच्या विजयात मोलाची भुमिका बजाविली. तर दुसऱ्या लढतीत नागपूर महिला संघाने मांड्या विद्यापीठाचा ३-१ पराभव केला. यात ऋतिका, शर्वरी मुळे, दुर्गा बोरकुटेने प्रत्येकी एक गोल नोंदविला. या विजयाच्या जोरावर रातुम नागपूर विद्यापीठाने उपांत्यफेरीत प्रवेश केला. नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने केलेल्या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच नागपूर विद्यापीठ विजेतेपद पटकावेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



# नवोदित खेळाडूंनी मिळालेल्या संधीचे सोनं करावे

## प्र कुलगुरु डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन

## क्रीडा परिचय नि:शुल्क उन्हाळी शिबीराचा समारोप

सुदृढ आरोग्यासाठी दैनंदिन व्यायाम करणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येकांनी किमान एका क्रीडा प्रकारात तरी नियमीत सहभाग नोंदवावा व तो खेळ नियमित खेळावा. या शिबिराच्या माध्यमातून उदयोन्मुख खेळाडूंना एकप्रकारची संधी मिळाली आहे. त्याचे सर्वांनी सोनं करावे असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी व्यक्त केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुढाकाराने तरंग फाऊंडेशनच्या वतीने क्रीडा परिचय नि:शुल्क उन्हाळी शिबीराचे आयोजन रवीनगरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे क्रीडा संकुल येथे करण्यात आले. या उपक्रमाचा समारोप नुकताच पार पडला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र कुलगुरु डॉ. संजय दुधे, नागपूर विद्यापीठ शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळुकर उपस्थित होते. याशिवाय व्यासपीठावर तरंग फाऊंडेशनच्या बरखा माथूर, डॉ. नितीन जंगीटवार, राजेंद्र जोशी, डॉ. शरद सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलतांना डॉ. दुधे म्हणाले, नवोदीत खेळाडूंनी शिस्तीचे पालन करावे, तसेच या शिबिरातून मिळालेल्या ज्ञान हे पुढे जाऊन क्रीडा क्षेत्रात मोठे कसे होता येईल यासाठी करावे. विद्यापीठाच्या क्रीडा विभागाने मिळवून दिलेल्या संधीचे सोनं युवा खेळाडूंनी करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. शिबीरात ॲथ्लेटिक्स, बॅडमिंटन, योगासने, मार्शल आर्ट, जिम्नॅस्टिक, बास्केटबॉल, टेबलटेनिस बुद्धीबळ , हँडबॉल, फुटबॉल या खेळाचे प्रशिक्षण नवोदित व इतर खेळाडूंना देण्यात आले. यात पाच ते पंधरा वर्षे वयोगटातील खेळाडूंना सहभागी झाले होते. प्रत्येक खेळाच्या सत्रानंतर खेळाडूंना पोषक आहार तसेच शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीबाबत माहीती देण्यात आली. शिबीरात ॲथ्लेटिक्स साठी भारतीय खेळ प्राधिकरणाची एन आय एस प्रशिक्षक सायली वाघमारे, बॅडमिंटनसाठी भारतीय खेळ प्राधिकरणाचे प्रशिक्षक जयेंद्र ढोले, योगासनासाठी देवयानी डोंगे, मार्शल आर्टसाठी विजय घिचारे, जिम्नॅस्टिकसाठी युगा बहादुर छेत्री, बास्केटबॉलसाठी भारतीय खेळ प्राधिकरणाच्या एन आय एस प्रशिक्षक स्मिता बाकरे व टेबल टेनिससाठी दीपक कानेटकर, हॅण्डबॉलसाठी राकेश बन्सोड, फुटबॉल साठी सुनिता वानखेडे, सुरज बिल्लोरे , बुद्धिबळसाठी जित ठाकरे यांनी शिबीरार्थींना मार्गदर्शन केले. याशिवाय स्पोर्ट्स मॅनेजमेंट ॲंड इंजुरीवर मास्टर प्रथमेश कोट्टेवार पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन, कुल डाऊन सेशन डॉ. सोनाली शिरभाते व झुंबाचे प्रशिक्षण शीतल बगळे यांनी घेतले. उत्कृष्ट शिबिरार्थीची निवड केली . लावण्या ढोरे सरस्वती विद्यालय शंकरनगर,रेयान राठोड सक्षम सेवासदन हायस्कूल येथील विद्यार्थी आहेत.यांना प्र-कुलगुरु यांच्या हस्ते गौरविण्यात आले. नागपूरचे प्रसिद्ध एरोमॉडेलिंग तज्ञ डॉ. राजेश जोशी सर (अ लिम्का रेकॉर्ड होल्डर) यांचा एरो मॉडेलिंग शो सादर करण्यात आले,विमानाचे प्रात्यक्षिक मुलांना दाखवण्यात आले .

समारोपीय कार्यक्रमात प्रशिक्षकांना प्रमाणपत्र व पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी खेळाडूंची बॅटरी टेस्ट देखील घेण्यात आली. प्रास्ताविक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी केले. संचालन अर्चना कोट्टेवार यांनी तर आभार युग बहादुर छेत्री यांनी मानले.






# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला सात सुवर्ण पदक

## अ.भा. मिनी गोल्फ स्पर्धेत विद्यापीठाचे निर्विवाद वर्चस्व

जेजेटी विद्यापीठ, झुंझूणू, राजस्थान यांच्या यजमान पदाखाली घेण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मिनी गोल्फ पुरुष महिलांच्या स्पर्धेत दमदार कामगिरी करीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या खेळाडूंनी विविध गटात सात सुवर्ण पदक प्राप्त करीत घवघवीत यश प्राप्त केले. सलग तिसऱ्या वर्षी देखील विद्यापीठाच्या खेळाडूंनी पदक मिळविण्याची कामगिरी कायम ठेवत स्पर्धेत निर्विवाद वर्चस्व निर्माण केले आहे.

